## ''नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास''

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका


**कार्यालय फोन** : २३८७ ७३०१, २३८८ ००७३

**WEB SITE** : **http://welcome.to/nkgsb**

**E-MAIL** : **nkgsbs@gmail.com**

**कार्यालयीन वेळ** : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)


।। साहसे श्रीः प्रतिवसति ।।

मूल्य रु. ५/-


| | | |
|---|---|---|
| क्रमांक ४ | वर्ष : ३२ | जानेवारी २०१२ |

**BOOK PACKET (PERIODICAL)**

Regd. with Registrar of Newspapers of India, Reg. No. RN37436/80


**TO,**


**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V. P. Road, Mumbai - 400 004.


### विवाहाचा सुवर्ण महोत्सव गाठणाऱ्या जोडप्यांना वार्षिक स्नेहसंमेलनांत स्मृतिचिन्हे दिली त्यांची नांवे

सौ. शैलजा व श्री सतीश शांताराम गायतोंडे, गोरेगांव
सौ. शुभांगी व श्री सुरेश शांताराम गायतोंडे, परळ
सौ. शांता व श्री भालचंद्र गणबा कुलकर्णी, पुणे
सौ. कुसुम व श्री मारुति शंकर मुझुमदार, माहीम
सौ. नीलिमा व श्री शशिकान्त महारुद्र नाडकर्णी, माहीम
सौ. आशा व श्री उमाकांत गोविंद फेणे, जोगेश्वरी

### ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना स्मृतिचिन्हे दिली त्यांची नांवे

अहिल्या अरुण आरस, माहीम
सुमती विठ्ठल बोरकर, मालाड
दिगंबर पुंडलीक इस्लूर, मीरा रोड
महेश्वर भुजंग कुलकर्णी, पार्ले
वसंत मनोहर नाडकर्णी, गांवदेवी
उमा सदानंद नाडकर्णी, अंधेरी
अरविंद नारायण नाडकर्णी, सांताक्रुज
अशोक विनायक वागळे, पुणे
स्मिता सदानंद वागळे, पार्ले
अरविंद काशिनाथ वर्टी, जोगेश्वरी
किशोरी यशवंत बोरकर, अंधेरी
दुर्गादास अनंत गायतोंडे, दादर
मंगेश वेंकटराव कंटक, ठाणे
रमाबाई भवानीशंकर कसबेकर, सदाशिवगड
उमाकान्त दत्तात्रय नाडकर्णी, मीरा रोड
शशिकान्त विनायक नाडकर्णी, माहीम
सुरेश गोविंद फेणे, बोरीवली
माधव सीताराम वागळे, दादर
सुमन दिगंबर वागळे, दादर


**ठाणे मंच वधूवर सूचक मंडळ - दादर येथे नवीन शाखा**

**संपर्क - सौ. उमा (बेबी) हरीहर वैष्णव**

१६२ प्रसाद, डॉ. एम. बी. राऊत मार्ग
प्रभात पोल्ट्री लेन, कॅडेल रोड, शिवाजी पार्क,
दूरध्वनी -२४४ ६५ ३६१

## हळदीकुंकू समारंभ - भगिनींस आमंत्रण

नेहमीचा मकरसंक्रांतीचा हळदीकुंकू समारंभ यंदा माहीम व ठाणे येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळांत वेळ काढून आपल्या लेकीसुनांसह सोयीस्कर ठिकाणी अवश्य यावे ही विनंती.

| | **माहीम** | **ठाणे** |
|---|---|---|
| **तारीख** | रविवार १५ जानेवारी २०१२ | रविवार १५ जानेवारी २०१२ |
| **कार्यस्थळ** | माटुंगा मित्रमंडळ<br>एफ ४, कर्नाटक बिल्डिंग,<br>मोगल लेन, माहीम, | श्रीमती तेजश्री श्री. देसाई यांच्या निवासस्थानी<br>उदयनगर सोसायटी,<br>पांचपाखाडी, ठाणे (प.) ३२५२९८३८ |
| **वेळ** | संध्याकाळी ५ ते ७ | संध्याकाळी ५ ते ७ |
| | **संघ कार्यकारिणीतर्फे**<br>सौ. किशोरी अ. वागळे<br>सौ. शोभा प्र. कामत | **सांस्कृतिक मंचतर्फे**<br>तेजश्री देसाई<br>शुभदा सु. कुलकर्णी |

## संपादकीय

## समाजसेविका प्रेमा पिकळे यांचे देहावसान

उत्तर कानडा जिल्हा म्हणजे अठरा विश्वे दारिद्र्याने गांजलेल्या शेतकऱ्यांचा आणि आदिवासींचा प्रदेश. ना पोटभर अन्न ना अंगभर वस्त्र. मग शिक्षण कुठून मिळणार ? या वंचित समाजाच्या समस्या ओळखून त्यांच्या हक्काकरिता झुंजणारे, त्यांच्यावर होणाऱ्या आत्याचाराला वाचा फोडणारे अंकोला येथील एक सुशिक्षित जोडपे म्हणजे श्री शेषगिरी (गिरी) पिकळे व सौ प्रेमा पिकळे. गिरीकाकांचे २३ मे २००७ रोजी निधन झाले तर प्रेमाकाकी यांचे २६ नोव्हेंबर २०११ रोजी देहावसन झाले.

उभयतांनी गरीबांच्या शिक्षणासाठी व समाजकार्यासाठी आपले उभे आयुष्य झोंकून दिले होते. १९६२ साली त्यांनी 'नूतन शिक्षण सभा ट्रस्ट' ही संस्था स्थापन केली. मुलीकरितां माध्यमिक शाळा सुरु केली. 'प्रायमरी टीचर्स कॉलेज' स्थापन केले, आरोग्यसेवा अल्पदरांत उपलब्ध व्हावी यासाठी 'कमल मेडिकल सेन्टर' सुरु केले व लहान मुलांसाठी शिशुवर्ग, गरीब विद्यार्थ्यांसाठी मोफत जेवण यासारख्या उपयुक्त योजना राबविल्या.

प्रेमाकाकींच्या अतुलनीय समाजसेवेसाठी आपल्या संघाने १९९५ साली म्हणजे संघाच्या हीरक महोत्सवाच्या प्रसंगी त्यांना सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत केले होते व त्यांचा जाहीर सत्कार केला होता.

नूतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा.



## प्रकाश झोत

## ११/ ११/ ११ रोजी आपल्या बँकेच्या ११ शाखांचे ११ सामान्य अशा असामान्य व्यक्तींमार्फत अनोख्या पद्धतीनें शुभारंभ

११/११/११ या तारीखेंतील ११ या आकड्याचा धागा पकडून एकाच दिवशी ११ मान्यवरांकडून ११ शाखांचे उद्घाटन करण्याचा आपल्या बँकेने एक अनोखा व दिमाखदार सोहळा सादर केला. प्रत्यक्ष उद्घाटनाचा समारंभ आदल्या दिवशी दादर येथील किंग जॉर्ज शाळेच्या सभागृहांत संपन्न झाला. सुप्रसिद्ध निवेदक प्रदीप भिडे यांनी या सोहळ्याचे समर्थपणें सूत्रसंचालन केले.

सर्वप्रथम बँकेचे लोकप्रिय व कर्तबगार चेअरमन महेश आरस यांनी एका चित्रफितीच्या साहाय्यानें बँकेच्या उज्ज्वल प्रगतीचा थोडक्यांत आढावा घेतला, बँकेची उद्दिष्टे सांगितली व सेवा, अर्थकारण व ग्राहकांचे समाधान या त्रिसूत्रांच्या भक्कम पाठबळावरची बँकेची वाटचाल विशद करून सांगितली. विशेष म्हणजे सर्व नूतन ११ शाखांची नावीन्यपूर्वक केलेली आकर्षक छायाचित्रे उपस्थितांना दाखविण्यांत आली. त्यानंतर, प्रतिष्ठित व्यक्ती, नेतेमंडळी अथवा सेलीब्रिटींजना बोलावून उद्घाटन करण्याच्या प्रथेला छेद देऊन विविध समाजकार्यांत सातत्यानें उत्कृष्ट कामगिरी करण्याऱ्या पण प्रकाश झोतापासून दूर असलेल्या सामान्य अशा असामान्य ११ व्यक्तींकडून ११ शाखांचे उद्घाटन करण्याचा कार्यक्रम सुरु झाला. सूत्रधार प्रदीप भिडे यांनी एकेका व्यक्तीला व्यासपीठावर बोलावून त्यांनी केलेल्या सेवेची थोडक्यांत माहिती दिली. त्या ११ व्यक्ती म्हणजे १) वात्सल्य ट्रस्टतर्फे निराधार बालकांचे संगोपन करण्यात हातभार लावणारे रंगनाथ हुक्केरी, २) स्वत: मूकबहिर असूनसुद्धा संगणकावर प्रावीण्य मिळवून इतर मूकबहिऱ्यांना त्याचे शिक्षण देऊन त्यांना रोजगार उपलब्ध करून देणारे ओंकार जोशी, ३) तळागाळांतील उपेक्षित मुलांना लघुपट बनविण्याचे तंत्रज्ञान शिकवून त्यांना मार्गी लावणारे अमरजीत आमले, ४) स्वत: रुग्ण असून सर्वसामान्य गरजूंना आपत्कालीन प्रसंगी रात्रंदिवस विनामूल्य साहाय्य करणारे डॉ. सवाई, ५) संगीताच्या माध्यमांतून कर्करुग्ण व त्यांचे ग्रासलेले नातेवाईक यांचे जीवन सुसह्य करण्याचा प्रयत्न करणारे गोपाळ जोगळेकर ६) अमेरिकेंतील गलेलठ्ठ पगाराची नोकरी सोडून नेरुर येथील ग्रामीण भागांत दारिद्र्यरेषेखालील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी माध्यमाची शाळा स्थापून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणारे डॉ. जनार्दन नेरुरकर ७) पडद्यामागील कष्टकरी रंगकर्मींचे हित सांभाळणारे नाटककार गंगाराम गवाणकर ८) आंधळ्या मुलांमधूनसुद्धा मल्लखांब व जिम्नॅस्टिक्सचे क्रीडापटू घडविणारे उदय देशपांडे ९) आदिवासी समाजामध्ये जाऊन तोंड, दांत व जिभांच्या आजारावर उपचार करणारे व त्याबद्दल जागरुकता निर्माण करणारे डॉ. सुदर्शन

रणपिसे, १०) तीन हजाराहून अधिक बेवारस मृतदेहांवर स्वखर्चाने विधीपूर्वक अंत्य संस्कार करणारे किशोर भट, व ११) गेली ३३ वर्षे आपल्या संघाचे लोकप्रिय त्रैमासिक ''मुखपत्रिका'' या नियतकालिकेची संपादकीय धुरा सांभाळून कारवारी ज्ञतिबांधवांची उन्नती साधण्यासाठी झटणारे द. ना. नाडकर्णी. या ११ ही उद्‌घाटकांना पावित्र्याचे प्रतीक म्हणून तुळशी वृंदावन ही आगळ्या प्रकारची भेट दिली.

मान्यवरांचा परिचय झाल्यावर रंगीबेरंगी फुलांनी शृंगारलेल्या एका पालखीचे लेझीम व पताकासह सभागृहांत आगमन झाले. या पालखींमध्ये ११ शाखांमध्ये स्थापन करण्यासाठी त्या त्या शाखांच्या नावे ११ अमृतकलश ठेवण्यांत आले होते. पालखीसोबत ११ युवती पारंपरिक नऊ वारी साड्या परिधान करून चालत होत्या. पालखी व्यासपीठाजवळ आल्यावर पालखीने मंगेशीच्या पालखीप्रमाणे एक पेणे (मुक्काम) घेतले. मग या ११ युवतींनी व्यासपीठावर जाऊन ११ मान्यवरांच्या हातात एकेक कलश ठेवला व त्या मान्यवरांनी त्या त्या शाखेच्या उद्‌घाटनाचे प्रतीक म्हणून ते अमृतकलश व्यासपीठाच्या समोरील भागांत ओळीने ठेवले. संयोजकांची ही संकल्पना खरोखरच हृदयस्पर्शी होती.

या दृष्ट लागण्यासारख्या शुभकार्यानंतर प्रमुख पाहुण्या मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या खुसखुशीत शब्दांतल्या विचारप्रवर्तक व्याख्यानानें श्रोते मंत्रमुग्ध झाले.

मध्यंतरानंतर संगीताचा बहारदार कार्यक्रम झाला. यात प्रसारमाध्यमातून चमकणारे अनेक कलाकार होते. अशा रीतीने या दिमाखदार सोहळ्याची सांगता झाली. अचूक नियोजन, आखीवरेखीव कार्यक्रम, रंगतदार सूत्र संचालन यामुळे हा सोहळा तुडुंब भरलेल्या सभागृहांतील प्रत्येक प्रेक्षकाच्या कायमच्या स्मरणांत राहील.

## आपल्या बँकेला ''उत्कृष्ट नागरी सहकारी बँक'' हा पुरस्कार

महाराष्ट्रांत सहकारी बँकांची ''महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह बँक्स असोसिएशन'' या नावाची एक शिखर संस्था आहे. या संस्थेतर्फे गेली सोळा वर्षे प्रतिवर्षी ''कै पद्मभूषण वसंतदादा पाटील उत्कृष्ट नागरी सहकारी बँक'' या नांवे पुरस्कार दिला जातो. २०११-१२ या वर्षाचा पुरस्कार अलीकडेच जाहीर झाला व तो पुरस्कार आपल्या बँकेला मिळालेला आहे. प्रत्यक्ष पुरस्कार वितरण समारंभ काही आठवड्यांत अपेक्षित आहे. आपल्या बँकेचे संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी यांच्या कार्यक्षम प्रयत्नामुळेंच बँकेला हे यश संपादन करता आले. सर्वाचे हार्दिक अभिनंदन.



## वार्षिक स्नेहसंमेलन

आपल्या ज्ञातीचे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक २० नोव्हेंबर रोजी दादर येथील अॅन्टोनियो डिसिल्व्हा हायस्कूलच्या सभागृहात नेहमीप्रमाणे उत्साहाने पार पडले. प्रमुख पाहुणे होते अॅटोमिक एनर्जीचे निवृत्त संचालक श्री. किरण श्रीपाद वाघ.

सुरुवातीला आपल्या सर्वांच्या परिचित प्रा. सुजाता केणी ह्यांनी उपस्थितांचे स्वागत केले. गणेशस्तवन झाल्यावर संघ व सोसायटीचे अध्यक्ष व उपाध्यक्षांतर्फे श्री. मंगेश शांतादुर्गेच्या प्रतिमेस हार घालण्यात आला. प्रा. केणी ह्यांनी प्रमुख पाहुणे व त्यांच्या पत्नीचे सर्वांतर्फे स्वागत केले. त्या दोघांचे संघ व सोसायटीच्या अध्यक्ष-उपाध्यक्षांसह व्यासपीठावर आगमन झाले. व दीपप्रज्वलन करण्यात आले.

त्यानंतर आपले दिवंगत कार्यकारिणी सभासद श्री. वसंत कसबेकर व श्री. विवेकानंद वागळे ह्यांच्या कार्याची श्री. प्रेमानंद नाडकर्णी ह्यांनी थोडक्यात माहिती करुन दिली. श्री. देवदास नाडकर्णी ह्यांनी दिवंगत बेबी बोरकर ऊर्फ बेबीताई ऊर्फ शांता बोरकर ह्यांचे व्यक्तिमत्व उलगडून दाखवले. इंग्रजीतला all rounder हा शब्द त्यांना अगदी चपखल बसतो. अशा व्यक्तिमत्वाला आपण कसं मुकलो हे त्या व्यक्तीच्या निधनानंतरच जास्ती जाणवू लागते. असो. ह्यानंतर आपल्या संघाच्या व एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारिणीच्या सभासदांची थोडक्यात ओळख करून देण्यात आली. संघाच्या अध्यक्षातर्फे पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह देऊन प्र. पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. सौ. उमा दळवी ह्यांनी सौ. उषाताई वाघ ह्यांचे स्वागत ओटी भरून केले. नंतर सोसायटीच्या अध्यक्षांनी पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचे स्वागत केले. संघाचे अध्यक्ष श्री. प्रेमानंद नाडकर्णी यांनी संघाचा गतवर्षीचा अहवाल सादर केला. सोसायटीच्या कामाचा आढावा अध्यक्ष श्री. देवदास नाडकर्णी ह्यांनी घेतला. दोन्ही अध्यक्षांनी देणगी-दारांचे आभार मानले व संघ व सोसायटीच्या कामांत मदत करण्यासाठी सर्वांनी, विशेषत: तरुणांनी पुढे यावे असे कळकळीचे आवाहन केले.

संघ व सोसायटीचे सेक्रेटरी श्री. नागेश (परेश) बर्डे ह्यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करुन दिली. व त्यांच्या वेगवेगळ्या achievements ची माहिती करुन दिली, जी वेळोवेळी आपल्याला मुखपत्रिकेत वाचायला मिळालीच आहे. त्यांचे वेगवेगळ्या क्षेत्रांतील प्रावीण्य ऐकून आपल्याला अचंबित व्हायला होते. श्री. दत्तात्रय नाडकर्णी चालवत असलेल्या मुखपत्रिकेमुळे आपल्या ज्ञातीतील कितीतरी रत्ने प्रकाशात आली ह्याची सत्यता पटते. आता प्रमुख पाहुण्यांचे भाषण. त्यांनी तरुणांना सल्ला दिला की Reconciliation with reality, honesty, hard work, & dedication leads to success. तसेच 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' हाच त्यांच्या आयुष्याचा मंत्र आहे. त्यांच्या भाषणांतून जाणवले, की विद्या विनयेन शोभते.

संघाच्या व एज्युकेशन सोसायटीच्या वार्षिक सर्वसाधारणसभांमध्ये कुठल्याही क्षेत्रांत ज्यांचे योगदान लक्षणीय असते अशा व्यक्तींना संस्थेचे सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत करण्यांत येते. त्या व्यक्तींचा नंतर वार्षिक स्नेहसंमेलनांत जाहीर सत्कार करण्यात येतो. गेल्या वार्षिक सर्वसाधारण सभांमध्ये उभय संस्थांनी कै. अरविंद नाडकर्णी यांना निधनोत्तर सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत करून घेतले होते. प्रथेनुसार या संमेलनांत कै. नाडकर्णी यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. सन्मानाचे प्रतीक म्हणून देण्यात येणारे स्मृतिचिन्ह त्यांच्या पत्नी श्रीमती स्नेहलता नाडकर्णी यांनी स्वीकारले. निर्यातश्री श्री. सतीश वाघ ह्यांचा परिचय श्री. गणपती नाडकर्णी ह्यांनी करून दिला. प्रमुख पाहुण्यांतर्फे त्यांचा सत्कार करण्यांत आला. त्यानंतर श्री. सतीश वाघ ह्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कष्ट, चिकाटी आणि सचोटी ह्या गुणांवर त्यांनी आपल्या कंपनीच्या उलाढालीचा शंभर कोटींचा टप्पा गाठला आहे. अत्यंत निगर्वी अशा ह्या गृहस्थाने भाषण करताकरताच आपल्या एज्युकेशन सोसायटीला दहा लाख रुपयांची देणगी देण्याची इच्छा प्रगट करून सर्वांना सुखद धक्का दिला.

ह्यानंतरचा कार्यक्रम म्हणजे वयाला ७५ वर्षे झालेल्या व्यक्तींचा व विवाहाची सुवर्णजयंती झालेल्या जोडप्यांचा सत्कार स्मृतिचिन्हे देऊन करण्यात आला. त्यानंतर संस्कृत पाठांतर स्पर्धेतल्या विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. लगेचच विविध परीक्षांत प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ झाला ह्याचे निवेदन श्री. संजय नाडकर्णी ह्यांनी केले. श्री. शिरीष वाघ यांनी आभार प्रदर्शनाचे भाषण केले. राष्ट्रगीताने ह्या कार्यक्रमाची सांगता झाली.

**– सौ. शीला बर्डे, माहीम**

MIPL
MANGSIDESH INVESTMENTS PVT. LTD.
Financial Advisors | Equity Trading | Public Issue
Mutual Funds | RBI Bonds | LIC, Mediclaim
Postal Schemes
corporate office
Bldg No.1, Flat No.1A, Saraswati Baug, HFS Road, Jogeshwari (E), Mumbai 400 060
Tel.: 2836 2057 / 2824 5298 / 6457 1272 - 85



## प्रतिक्रिया

### जन्मशताब्दीच्या निमित्ताने – डॉ.अ.वा. वर्टी

ऑक्टोबरच्या मुखपत्रिकेतला श्री. नाडकर्णी यांनी माझ्या वडिलांवर लिहिलेला – डॉ. अ.वा. वर्टी यांची जन्मशताब्दी – हा लेख वाचून माझ्या मनात त्यांच्याविषयी काही आठवणी जाग्या झाल्या. लेखक म्हणून ते प्रसिद्ध असले तरी एक वडील म्हणून ते कसे होते ते सांगणार आहे.

बाबा जरी पेशाने डॉक्टर असले तरी त्यांना उपजतच विनोदी बुद्धी होती. माझे आजोबा डॉ. वामन अंबाजी वर्टी हे सुद्धा जरी डॉक्टर असले तरी ते बोलतांना खूप विनोद करीत. आचार्य अत्र्यांना सुद्धा त्यांनी आपल्या विनोदी स्वभावामुळे हसवून बेजार केले होते. आणि हा गुण त्यांच्या सगळ्या मुलांत उतरला होता. माझे काका लोक सुद्धा बोलतांना खूप हसवतात. माझ्या आई बाबांना खेळांची सुद्धा खूप आवड होती. बाबांनी आईला बॅडमिंटनमध्ये तयार केले होते. Mixed double मध्ये त्यांनी बरीच बक्षिसे मिळवली होती. त्यांचा जोडा अगदी लक्ष्मीनारायणासारखा दिसे. माझी आई अत्यंत सुस्वरुप होती. व्ही. शांतारामांनी तिला शकुंतलेची भूमिका करण्याबाबत विचारले होते. पण बाबांनी परवानगी दिली नाही.

बाबा अतिशय शांत वृत्तीचे होते. ते क्वचितच रागवत. जीवनाबद्दलची त्यांची एक अलिप्त वृत्ती होती. त्यांना सगळे देवमाणूस म्हणत. दवाखान्यांत औषध देतांना कधी जास्त पैसे आकारले नाहीत. इतर डॉक्टर दोन रुपये घेत पण बाबा फक्त आठ आणे घेत. खेड्यावरची माणसे जेव्हां येत तेव्हां त्यांच्याशी ते गप्पा मारत बसत. त्यातून एखादे कथानक मिळते असे ते म्हणत.

त्यांची मित्रमंडळी म्हणजे श्री. वसंत कानेटकर, कुसुमाग्रज, श्री. सोपानदेव चौधरी व श्री. ना.धों. ताम्हनकर होते. यात श्री. सोपानदेव चौधरी व श्री. ना.धों. ताम्हनकर हे पण नासिकवासी झाल्याने पुष्कळ वेळा आमच्या घरी येत. त्यावेळी त्यांच्या ज्या गप्पा चालत त्या ऐकण्याचे भाग्य आम्हांला लाभले. तसेच ह्या पंचकाची गप्पाची मैफल शिवाजी उद्यानांत ठराविक वारी भरत असे व खूप रंगत असे. आमच्या घरी जवळजवळ सर्व साहित्यिक येऊन गेलेत.

''अमृत'' मासिक बाबांनी काढले तेव्हा आमच्या घरी तऱ्हेतऱ्हेचे वाचनीय साहित्य येत असे. बाबा रात्री २–३ वाजेपर्यंत वाचीत बसत. त्यांच्यामुळे आम्हांलाही वाचनाची गोडी लागली.

बाबांना ते जायच्या आधी पोटांत Aortic Aneurison झाला होता. तेव्हा त्यांनी खचून न जाता माझा सर्जन मुलगा डॉ. दत्तात्रेय याच्या मदतीने त्याबद्दलची सर्व माहिती वाचून काढली होती. त्याचे after effects पण त्यांना माहित होते. त्यामुळे त्यांना शस्त्रक्रियेसाठी जेव्हां बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते तेव्हां ते टाळण्यासाठी तेथून ते चक्क पळून गेले. त्यांचे म्हणणे, ''माझ्या आयुष्याबद्दल काही तक्रारी नाहीत. मी माझ्या जीवनाबद्दल सुखी आहे तेव्हां मला नैसर्गिक

मरण येऊ द्या'' आणि तसेच झाले.

त्याच्या मृत्यूनंतर त्यांना श्रद्धांजली वाहताना ज्येष्ठ साहित्यिक कुसुमाग्रज म्हणाले होते, ''महाराष्ट्राच्या वाङ्‌मयीन नकाशांत डॉ. अ.वा. वर्टी यांनी नासिकला महत्त्वाचे स्थान मिळवून दिले. जिल्हा साहित्य मेळावा ही त्यांनी नासिक शहराला मोठीच देणगी दिली आहे. त्यांच्या निधनाने नासिकचे वैभव अस्तंगत झाले हे खरे."

**- सौ. स्मिता प्रकाश मुझुमदार, वांद्रे (पू.)**

## "बेबीताई-एक स्नेहल सावली"

''ठाणे मंचचा बुरुज ढासळला'' हा श्री. सुरेश पालेकर यांनी मागच्या मुखपत्रिकेत लिहिलेला कै. शांता (बेबीताई) बोरकर यांच्यावरील लेख वाचला, आणि अनेक स्मृती चाळवल्या.

कित्येक वेळा काळाचं चक्र निर्घृणपणे आघात करीत जातं, आणि त्याकडे अगतिकपणे पाहण्याखेरीज माणसाच्या हातात काहीच नसतं! मागच्या काही कालावधीतील घटना पाहिल्या, की याची प्रचीती आल्यावाचून रहात नाही! शान्तीनगरमधील आमच्या तीन ज्येष्ठ भगिनी-विमलताई वागळे, नलूताई वर्टी, आणि आता बेबीताई बोरकर या तिघींनी एकामागोमाग एक या जगाचा निरोप घेतला, आणि आमच्या महिला - मंडळातील मैत्रीच्या शृंखलेतले हे तीन दुवेच निखळून पडल्याचं दुःख झालं!

खरंच! मैत्री, सख्य, प्रेम, आनंद यांसारख्या भावना व्यक्त करण्यासाठी कसलंही बंधन नसतं, अगदी वयाचं देखील! याचं मूर्तिमंत उदाहरण आमच्या समोर सतत असायचं, ते बेबीताईंच्या रूपानं!

मंडळात गप्पा रंगायच्या, हास्याचे फवारे उडायचे, वाचलेल्या साहित्यावर, पाहिलेल्या कार्यक्रमांवर मत- मतान्तरं प्रकट व्हायची, त्यात बेबीताईंचा नेहमीच सहभाग असायचा. अनेक गोष्टींचा, नानाविध अनुभवांचा खजिनाच आपल्या बोलण्यातनं त्या आमच्यापुढे रिता करायच्या.

''हातातोंडाची लढाई'' या मराठीतल्या वाक्यप्रचाराचा संबंध केवळ खाण्याशी असतो. पण बेबीताईंच्या बाबतीत याला थोडा वेगळा संदर्भ होता. कारण ''तोंडाने गप्पा'', तर ''हातांनी लोकरीचं विणकाम'' अशा प्रकारे एकाच वेळी दोन्ही आघाड्या त्या कौशल्यानं सांभाळीत असत. त्यांनी विणलेले विविध नमुन्यांचे स्वेटर्स पाहण्यातही एक आनंद मिळत असे. गोधडी हा शब्द किती ओबडधोबड! पण या गोधड्यांमधूनही आपलं कलाकौशल्य साकार करून त्यांना दुलईप्रमाणे मुलायम बनविण्याची किमयाच जणू त्यांना साधली होती!

आपल्या संघातर्फे चालविण्यात येणाऱ्या ''वधू-वर सूचक मंडळा'' च्या अध्वर्यू बेबीताई आणि अनसूयाताई कसबेकर यांनी दीर्घकाळ जोडीनं काम केलं. पण अनसूयाताई माहीमहून दुसरीकडे गेल्यानंतर हे मंडळ म्हणजे ज्याला बेबीताईंनी आधार दिला, असा ''एकखांबी तंबू''च



झाला होता. कोणत्याही दिवशी, कोणत्याही वेळी (ठरलेला दिवस सोडून) गरजू पालक आले, तरी बेबीताई त्यांना निराश करीत नसत. समाजकार्य कसे करावे या विषयाचा वस्तुपाठ घेण्यासाठी कोणताही अभ्यासक्रम केला नाही, तरी त्यांनी वयाच्या अठ्ठ्याऐंशी वर्षांपर्यंत जे काम केलं त्याला खरोखरच तोड नाही!

निरनिराळे खाद्यपदार्थ बनविण्याची त्यांची आवड तर तरुणाईलाही लाजवील, अशी होती! त्यांच्या घरी गेलेलं कोणीही, त्यांच्या हातच्या एखाद्या स्वादिष्ट पदार्थांची लज्जत चाखल्याशिवाय कधीच परत जात नसे.

शान्तीनगर महिला मंडळ, कॉफी क्लब, कारवार नेबरहुड अशा सगळ्या गटात तितक्याच आपुलकीनं, गोडीनं उपस्थित राहून प्रत्येक कार्यक्रमात हौसेनं भाग घेणाऱ्या बेबीताई म्हणजे मूर्तिमंत उत्साहच होत्या! आमच्या बरोबर सहलींना येणाऱ्या, आमच्या साऱ्या स्पर्धांमध्ये-अगदी फॅन्सी ड्रेसमध्येही - भाग घेणाऱ्या, आकाशवाणीवरील आमच्या कार्यक्रमात साथ देणाऱ्या आमच्या या ज्येष्ठ मैत्रिणीचे 'हय गो पोरां', 'ना गो बाळा' हे मायेचे शब्द ऐकले, की वयाची सत्तरी ओलांडली, तरी आपण लहानच असल्याचा भास आमच्या मनात निर्माण होई!

बेबीताई आज आमच्यात नाहीत. पण त्यांची आठवण सदैव आमच्या मनात जागत राहील! त्यांना शब्दफुलांची ही आदरांजली!!

**- सौ. नीलिमा शशिकान्त नाडकर्णी, माहीम**

## 'मॉडेल हाऊस' नावाची दिमाखदार वसाहत

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात ''नररत्नांची खाण मॉडेल हाऊसची सत्तरी'' हा लेख वाचनांत आला आणि मनांत अनेक भावनांचा कल्लोळ उडाला. ''आठवणी दाटतात'' अशी अवस्था झाली. १९६७ ते २००२ अशी उमेदीच्या वयाची तब्बल ३५ वर्षे तेथे नांदण्याचा मला भाग्ययोग लाभला. दिगम्बरमाम नाडकर्णी व गोरबाय यांची सून असा कारवारकरांचा खास शिक्का घेऊन मी मॉडेल हाऊसमध्ये प्रवेश केला. तिथल्या सहजीवनांत व संस्कृतीत लगेच एकरूप कशी झाले ते कळलेही नाही. कारण मॉडेल हाऊस मध्ये फ्लॅट सिस्टीम असली तरी त्यांची रचना अशी होती की ती चाळीचीच सुधारून वाढविलेली आकृती वाटावी. मधला भला मोठा चौक. त्याच्या चारही बाजूने इमारती. प्रत्येक फ्लॅटच्या बाल्कन्या मधल्या चौकाशी अभिमुख असलेली. फ्लॅटमध्ये आलेली मंडळी आसपासच्या चाळींतच राहून आलेली असल्यांमुळे ती शेजारधर्माचा वसा घेवूनच आली होती. पडदे लावून स्वतःला गुडुप करून घ्यायची पद्धत नव्हती. त्यांमुळे समोरासमोरच्या फ्लॅटमधून एकमेकांच्या घरांत काय चालले आहे, स्वयंपाकघरांत तव्यावर काय टाकले आहे ते अगदी वासासकट समजायचे. कोळीण मासे घेऊन आली आणि तिने टोपली टेकवायचा अवकाश, की तिच्यावर चोहोंबाजूने हल्ला झालाच. भावाबद्दल हुज्जत घातल्याशिवाय व लटकी शाब्दिक चकमक केल्याशिवाय मासे खरेदीमध्ये मजाच नाही. पापड, सांडगे, चिंचेचे गोळे अशी उन्हाळी वाळवणे

या चौकातच घातली जायची. अशा प्रकारच्या वातावरणामुळे सर्वजण सतत एकमेकांच्या संपर्कात असत. त्यांमुळे सर्वांचे एक विशाल कुटुंबच तयार झाले होते. एकमेकांच्या सुखदु:खात सहभागी होणे, सर्व मुलांवर सुसंस्कार करणे, गोकुळाष्टमी, दिवाळी, होळी सारखे उत्सव एकत्र साजरे करणे, काही खास पक्वान्न किंवा मासे मटणाचे पदार्थ केल्यास आपल्या घासातला एक घास शेजाऱ्याला देणे, किंवा शेजारच्या घरांतून खमंग वास आल्यास हक्काने तेथे जाऊन त्याची चव घेणे हे सर्व म्हणजे सहजीवनाचा व सुखी जीवनाचा आदर्शच होता. मॉडेल हाऊसमधले दिवाळीचे सांस्कृतिक कार्यक्रम तर गिरगावकरांचे भूषण होते. व त्या मंचावरुनच सुमन कल्याणपूर, शामा चित्ताल, भक्ती बर्वे सारखे नामांकित कलाकार पुढे आले. या कार्यक्रमाच्या संयोजनामुळे लहानपणापासूनच मुलांमध्ये समाधीटपणा यायला प्रोत्साहन मिळाले. त्याचेच ज्वलंत उदाहरण म्हणजे आपल्या बँकेचे कर्तबगार चेअरमन महेश आरस हे तिथले उत्साही कार्यकर्ते म्हणून सर्वांचे लाडके होते.

मॉडेल हाऊसमध्ये नव्याने प्रवेश करणारी नववधू येत असल्याची वर्दी चौकांत खेळणाऱ्या मुलाबाळांकडून मिळतांच सगळ्या बाल्कन्या भरून जात आणि कौतुक भरल्या नजरांनी तिचे स्वागत होत असे. मोठ्या माणसांत वादविवाद झाले व वितुष्ट आले तर त्याची झळ बाळगोपाळांना कधीच लागू दिली नाही एवढा समंजसपणा सर्वांमध्ये होता. आईवडील कामानिमित्त कुठे बाहेर गेल्यास मुलांचे कसे होईल अशी कुणालाच चिंता नसायची. कारण शेजारी त्यांचे घरच्यापेक्षा जास्त कोडकौतुक करीत असत.

चौकामध्ये मुले मोकळेपणाने खेळत, बागडत, ''डबा ऐसपैस '' किंवा लपंडाव खेळतांना लपायला भरपूर जागा होती. प्रत्येक संध्याकाळ मुलांच्या किलबिलाटांने ही वास्तू गजबजून जायची पु.लं.च्या ''वाऱ्यावरची वरात'' मधील रविवार सकाळ ही संगीतमय तर मॉडेल हाऊसमधील रविवार सकाळ ही क्रिकेटमय. आजुबाजूचा परिसर दणदणून जायचा. एखाद्याने मारलेली सिक्सर एकतर समोरच्या काचेचा वेध घ्यायची किंवा चेंडू अवचितपणे चुलीवर रटरटत असलेल्या मटणांच्या पातेल्यांत उडी घ्यायचा. मग काय? चौकाचे रणांगण व्हायचे! पळपुट्या मुलांची धावपळ आणि उरलेल्या क्रिकेटवीरांना त्या पीडित घरांतील गृहिणीची गजाल ऐकण्याशिवाय गत्यंतर नसे. चेंडू एकतर जप्त व्हायचा किंवा विळीवर चिरला जाऊन चौकात फेकला जायचा. नंतर वर्गणी काढून फुटलेली कांच ''भरुन'' दिली जात असे.

रहिवाश्यांच्या ''महापर्वाणयात्रा'' देखील याच चौकांतून निघायच्या. दिवसभर वातावरण शोकाकुल असे. मुले देखील दबल्या आवाजांतच बोलत असत

अशा या मॉडेल हाऊसच्या अनेक गमतीजमती व किस्से सांगण्यासारखे आहेत. पण शब्दांची मर्यादा ही पाळलीच पाहिजे. मॉडेल हाऊसने सुखासमाधानाने शंभरी गाठावी ही शुभेच्छा.

**– शैलजा मंगेश नाडकर्णी, शिवाजीपार्क**



## मूर्तिकार विनायकराव वाघ यांच्या बद्दल एक जुनी याद

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्री किरण श्रीपाद वाघ यांचा परिचय वाचनात आला तेव्हा श्री किरण वाघ यांचे चुलत काका चौपाटीवरचे प्रख्यात मूर्तिकार कै. विनायकराव वाघ यांच्याबद्दल एक जुनी ''याद'' आली. वृद्धत्त्वांत आठवणींची शिदोरी बरीच उपयोगांत येते. जवळचे आप्तेष्ट निघून जातात, उरतात त्या फक्त आठवणी. अशीच एक आठवण.

१९४२–४३ ची गोष्ट, पुणे येथे मी, भास्कर पिकळे व बाबू बोरकर एका खोलींत नोकरीच्या निमित्त राहत होतो. दर शनिवारी कारवारला जाण्यासाठी सोयिस्कर अशी हुबळीला जाणारी गाडी फलाटावर असायची. आम्ही तेथे कोणी भेटतात का म्हणून बघून जेवण आटोपून खोलीवर जात असूं. एका शनिवारी मूर्तिकार विनायकराव वाघ फलाटावरील एका बाकावर बसलेले दिसले. त्यांचा चेहरा खिन्न दिसत होता. म्हणून आम्ही त्यांची चौकशी केली, तर कळले की इंटर क्लासचे आरक्षित तिकीट असूनसुद्धा काही तरुण मुले त्यांच्या सीटवर बसून दादागिरी करत होती. त्यावेळी ''पुना इलेक्ट्रीक'' या कंपनीमध्ये मनु गंगोळी नांवाचा एक रुबाबदार व आडदांड गृहस्थ सुपरवाइझर होता. तो कारवारी असल्याने आमच्या चांगला ओळखीचा होता. एक टी.सी. दुसऱ्या फलाटावर होता. त्याला बोलावलं असते तर खूप वेळ खर्ची पडला असता. गाडी सुटायला थोडाच वेळ शिल्लक होता. म्हणून आम्ही गंगोळीला बोलावून घडलेली घटना सांगितली. गंगोळी जवळ आलेला बघताच ती मुले पळून पसार झाली व मग विनायकराव प्रसन्न चेहऱ्यांने सीटवर बसूं शकले व त्यांचा कारवारपर्यंतचा प्रवास सुखाचा गेला.

आम्ही गंगोळीचे आभार मानले. विनायकरावांचा प्रसन्न चेहरा बघून आम्हांलाही समाधान वाटले. अशी ही याद!

**– महाबळेश्वर (बाबू) ब्रह्मे, जोगेश्वरी**

### विवाह / वाङ्‌निश्चय

| | | |
|---|---|---|
| प्रियांका नटेश आंबे, कारवार | व | संदीप किशोर भट, बेळगांव |
| ज्ञानेश माधव भद्री, दांडेली | व | नंदिता उमेश कुडवा, उडपी |
| कमलेश माधव भद्री, दांडेली | व | शिल्पा श्रीकांत शानभाग, अंकोला |
| पूर्वा राजीव बोरकर, माहीम | व | मयूर दिलीप शिगरे, शिवाजी पार्क |
| दुर्गेश विठ्ठल कुलकर्णी, पुणे | व | कांचन रतन वाध्वानी, पुणे |
| पंकज अनिल कुलकर्णी, ठाणे | व | सायली धारडे, नाशिक |
| अक्षता अनिल स्थळेकर, दांडेली | व | श्रीनिवास विठ्ठल नायक, यल्लापूर |
| दीपाली प्रकाश वाघ, मुलुंड | व | पराग रमेश महाले, पुणे |
| नंदिता अशोक वागळे, पुणे | व | मुकुंद दिगंबर लेले, पुणे |

## संघाचे उपाध्यक्ष श्री वसंत कसबेकर यांचे निधन

चेंबूर येथे राहणारे श्री वसंत महारुद्र कसबेकर हे सचिवालयांत अण्डर सेक्रेटरी या पदावरुन निवृत्त झाले होते. निवृत्तीनंतर त्यांनी लगेच आपला संघ व एज्युकेशन सोसायटी या उभय संस्थासाठी काम करण्यासाठी स्वत:ला वाहून घेतले. म्हातारपणांत सुद्धा ते चेंबूर ते ग्रांट रोड हा लांबचा प्रवास जवळजवळ रोज करीत असत. संघाचे उपाध्यक्ष व एज्युकेशन सोसायटीचे खजिनदार ही महत्त्वाची पदे त्यांनी भुषविली. त्यांचे अलीकडेच म्हणजे २१ ऑक्टोबर रोजी दु:खद निधन झाले. मितभाषी, शांत, तांत्रिक मुद्यांची जाण, सर्वांशी मिळून मिसळून राहण्याची पद्धत यांमुळे ते सहकाऱ्यांमध्ये लोकप्रिय होते.

### निधन

| | | |
|---|---|---|
| दुर्गादास रामचंद्र भेंडे | (हळियाळ), | नेरूळ |
| गजानन सीताराम बोरकर | (कडवाड), | माहीम |
| सुनील नारायण दुभाषी | (कारवार), | अमेरिका |
| वसंत महारुद्र कसबेकर, | (कडवाड), | चेंबूर |
| नंदिनी (सिंधू) मधुकर कुलकर्णी | (किन्नर), | वाळकेश्वर |
| सुहास नागेश नाडकर्णी | (अंकोला), | ग्रांट रोड |
| सिंधू सच्चिदानंद नाडकर्णी | (सांवरपै), | माहीम |
| प्रेमा शेषगिरी (गिरी) पिकळे | (अंकोला), | अंकोला |
| गजानन सदाशिव पिकळे | (अंकोला), | अंधेरी |
| इंदिरा (मर्तुल) दिनकर सुखटणकर | (होन्नावर), | माहीम |
| सुरेखा महाबळेश्वर वाघ | (सदाशिवगड), | सांताक्रुज |
| कृष्णा भवानी वर्टी | (सदाशिवगड), | डोंबीवली |
| सुरेश देवीदास वर्टी | (बाड), | भिवंडी |

**PERFECT PEST CONTROL**

**Government Licence Holder**

**Relief from all kind of pests**

For Service Contact :

**Deepak Nadkarni (9869058481)**

**Off.:** Bldg. No. 99, Anandvan C.H.S., Near Hanuman Mandir, Samata Nagar, Kandivali (E), Mumbai - 400 101. • **Tel.:** 2884 2981 • **E-mail :** ppcmumbai@yahoo.in





## १० वर्षापूर्वीचा वाय.टी. नाडकर्णी यांच्या विवाहाचा फोटो

**स्थळ :** होन्नेकेरी, अंकोला

कारवार येथील एक नामांकित वकील व स्वातंत्र्यसैनिक श्री वाय.टी. नाडकर्णी व त्यांची बहीण सौ. गोदावरी यांचा एकाच दिवशी विवाह झाला तो जुना फोटो.

**वधूवर :** कु. गोदावरी त्र्यंबक नाडकर्णी व पुंडलीक रामचंद्र इस्लूर
कु. राधाबाई (विठाई) गणेश इस्लूर व यशवंत त्र्यंबक नाडकर्णी

(महिलांची नांवे विवाहावेळची आहेत. कंसात माहेरची / विवाहानंतरची आहेत.)

**उभे (सर्वात मागे) :** १. शांताबाई श्रीपाद नाडकर्णी (कु. चंदाका नारायण शेटगिरी) कडेवर काशिनाथ नाडकर्णी २. अनसूया दत्तात्रय वागळे (कु. अनसूया शंकर पिंगे, उळवी) ३. जानकी रामचंद्र पिंगे (कु. सावित्री गोविंद कुलकर्णी, हळगे) कडेवर सुब्राय उर्फ मनोहर पिंगे ४. भागीरथी वासुदेव पिंगे (कु. सुंदरी सदाशिव वागळे, भाजाळी)

**उभे (पुढे) :** १. नारायण त्र्यं. नाडकर्णी (एन्.टी) २. उमाबाई विनायक नाडकर्णी (कु. मतन शंकर पिंगे, उळवी) ३. कु. गोदावरी त्र्यं. नाडकर्णी (लक्ष्मीबाई पुंडलीक इस्लूर) ४. दुर्गाबाई त्र्यं. नाडकर्णी (कु. भागीरथी रामचंद्र पिंगे) ५. मथुरा शिवराम नाडकर्णी (अंबिका) ६. उमाबाई शंकर पिंगे ७. कु. विठाई गणेश इस्लूर (राधाबाई यशवंत नाडकर्णी) ८. रमाबाई सुब्राय नाडकर्णी (कु. सावित्री विश्वनाथ बोरकर, कोडीबाग) ९. उमाबाई महाबळेश्वर कुलकर्णी (कु. भिम्याक त्र्यं. नाडकर्णी)

**खुर्चीवर :** १. दत्तात्रय नरहरी नाडकर्णी २. विनायक त्र्यं नाडकर्णी (व्ही.टी.) ३. पुंडलीक रामचंद्र इस्लूर ४. त्र्यंबक घनश्याम नाडकर्णी ५. शिवराम बाबुराव नाडकर्णी ६. शंकर रामचंद्र पिंगे ७. यशवंत त्र्यं. नाडकर्णी (वाय.टी.) ८. सुब्राय दत्तात्रय नाडकर्णी ९. महाबळेश्वर मुकुंद कुलकर्णी

**खाली बसलेले :** १. महारुद्र शंकर पिंगे २. कु. अनसूया त्र्यं. नाडकर्णी (अनसूया सुखटणकर) ३. कु. सुशीला/आनंदाक दत्तात्रय वागळे (राधाबाई बाळकृष्ण बोरकर, कोडीबाग) ४. अनंत शिवराम नाडकर्णी ५. कु. कमला दत्तात्रय नाडकर्णी (कमला वेंकटराव इस्लूर) ६. कु. उमा विश्वनाथ बोरकर (अन्नपूर्णा वेंकट कुलकर्णी, किन्नर) ७. कु. मनी विश्वनाथ बोरकर (कृष्णाबाई सबनीस) ८. कु. कृष्णाबाई (काशाका) श्रीपाद नाडकर्णी (कृष्णाबाई दिनकर कुलकर्णी, हळगे, शेठ शांतारामांची सून)



## ।। तस्मै श्री गुरवे नमः।।

## शिक्षकदिनी विद्यार्थीप्रिय अध्यापक डॉ. अरविन्द विट्ठल नाडकर्णी यांच्यावर ''दै लोकसत्ता'' मध्ये खास लेख.

तांत्रिक किंवा इतर कोणत्याही शाखेचं उच्च शिक्षण घेण्यासाठी परदेशगमन करून तेथेच स्थायिक व्हावं, मनाजोगं अर्थार्जन करावं, ही आजकालच्या बहुसंख्य सुशिक्षित तरुण–तरुणींची मनोवृत्ती बनली आहे. परदेशात वास्तव्य करणं शक्य नसेल, तर कमीत कमी मोठ्या शहरात राहून जास्तीत जास्त अर्थार्जन करावं, ही आकांक्षा असतेच. तिथल्या आलिशान इमारती, आरामदायी वाहनं, चैनीचं आमिष दाखविणारी नानाविध प्रलोभनं, या सर्वांचा मोह माणसाला वाटणं, ही माणसाची नैसर्गिक, सहजप्रवृत्ती आहे, हे उघडच आहे. पण अशाही काही अपवादात्मक व्यक्ती असतात, ज्या या सत्याला छेद देऊन काहीतरी आगळंवेगळं ध्येय डोळ्यांसमोर ठेवतात, आणि आपली विद्या, किंबहुना आपला जन्मच त्यासाठी वाहून देतात!

अशाच एका आगळ्या व्यक्तीचा परिचय आपल्याला करून देत आहे. शिक्षक–दिनानिमित्त अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूंची स्मृती जागवीत त्यांना मानवंदना दिली. ''लोकसत्ता'' या वर्तमानपत्रात गुरुंच्या गौरवपर असाच एक लेख आला होता. ''डॉ. सुहास जेवळीकर'' या शिष्याने आपल्या गुरुचे गुणगान पुढील शब्दात केले होते. .... "आयुष्यात एखादं पद किंवा किंवा अधिकार मिळाला, तर त्या पदाचा वापर करुन अधिकारशाही गाजविण्याऐवजी, करता येईल तितक्या असंख्यजणांचं भलं करावं. काम झाल्यानंतर त्यातील ऐंशी टक्के लोक आपल्याला विसरून जातात. पण वीस टक्के लोकांच्या मनात तरी तुमच्याबद्दलच्या आपुलकीची ज्योत तेवत असते. तीच आपल्या आयुष्यातली कमाई, हे सत्य शिकविणाऱ्या सरांचे अध्यापन व मार्गदर्शन केवळ विषयातील गुंतागुंतीचे प्रश्न सोडविण्यापुरतेच मर्यादित नव्हते, तर जीवन जगण्यातील असंख्य पाठही देऊन गेलं. म्हणूनच, आजच्या या बेभरवशाच्या जीवनात त्यांचं निर्मळ, नितळ, सात्त्विक व्यक्तिमत्त्व आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आठवत राहील."

''शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने एक दीपस्तंभ असतो. अज्ञानाचा अंधार दूर करीत असतानाच, जीवनाचा योग्य मार्गही तो दाखवीत असतो'', अशी शिक्षकाची जी ओळख आहे, तीच वरील शब्दांतून अधोरेखित झाली आहे. हे सारं वर्णन आहे एका आदर्श, विद्यार्थीप्रिय अध्यापकाचं, अर्थात, ''डॉ. अरविन्द विठ्ठल नाडकर्णी'' यांचं! कै. विठ्ठल डी. नाडकर्णी यांचे सुपुत्र, आणि कारवारच्या जुन्या पिढीमधील ''सरकारकून'' नाडकर्णी यांचे नातू.

हिरवीगर वनराजी, पर्वतांवरील वृक्षराई, फेसाळता–निळाशार सागर या साऱ्यांच्या सान्निध्यात कारवारमध्ये बालपण व्यतीत करण्याची संधी त्यांना मिळालीच, शिवाय घरातच असलेल्या विविध पाळीव प्राण्यांची संगत लाभल्यामुळे या सर्वांविषयी, किंबहुना निसर्गाविषयीच एक आत्मीयता त्यांच्या मनात निर्माण झाली. स्वत:चं शिक्षण आणि कर्तव्य या दोहोंतील श्रद्धा

आणि शिस्त यांचे पाठ देणारे आजोबा घरातच होते, तर अभ्यासाव्यतिरिक्त कला आणि सांस्कृतिक विषयांची अभिरुची निर्माण करणारे उत्तम संस्कार ''बालमन्दिर'' व ''हिन्दू हायस्कूल'' या संस्थांमधून लाभत होते.

वडिलांच्या बदलीच्या निमित्ताने कोल्हापूरला गेल्यानंतर या कलानगरीतील वातावरणाने आणि सन्मित्रांच्या सहवासाने डॉ. अरविन्द यांचं सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडण्यास मदत झाली. अभ्यास व इतर कार्यक्रमातही पुढे येण्यास वाव मिळत गेला.

नववीनंतरचं शिक्षण औरंगाबाद येथे झालं. येथील सर्व अध्यापक विशेषत: गणिताचे प्राध्यापक श्री. जोशी यांच्या प्रेरणेनं आणि उत्तेजनानं (H.S.C.) परीक्षेत गुणवत्ता यादीत पहिल्या दहा क्रमांकात येण्याचा मान मिळविण्याचं स्वप्न सत्यात उतरविण्याइतकी प्रगती करता आली. यानंतर वैद्यकीय (मेडिकल) शाखेची निवड करून औरंगाबादच्या गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेजमध्ये स्वत:च्या गुणवत्तेवरच प्रवेश मिळविला. दरम्यानच्या काळात वडील बदली होऊन जयसिंगपूरला गेल्यामुळे डॉ.ना वसतिगृहात रहावं लागलं. पण मार्गात समस्या झाली, तर तिचं सोनं कसं करावं, याचं छानसं उदाहरण त्यांच्या उद्‌गारांतून दिसतं ते म्हणतात, "स्पर्धात्मक सामाजिक जीवनाला सामोरं जाण्याची प्रगल्भता, आणि स्वावलंबन या दोन गोष्टी वसतिगृहातील वास्तव्यात मला दिल्या.

१९७२ साली M.B.B.S. झाल्यानंतर, ''स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र'' (Obstetrics and Gynaccology) या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेण्याची इच्छा असूनही मर्यादित जागा व केवळ एका गुणाच्या तफावतीमुळे डॉक्टरांची ही संधी हुकली. त्यामुळे M.D. साठी त्यांनी ''बधिरीकरण शास्त्र'' (Anaesthesia) हा विषय घेतला. ''हाती घ्याल, त्या विषयात यशस्वी व्हाल'', हे जणू वरदान लाभल्याने त्यांनी गुणवत्तेसह यश प्राप्त केलं. यामुळे खरं तर, ते द्रव्यार्जनाच्या राजमार्गावर पोहोचले होते. पण ज्ञानलालसा, विद्यादानाची आवड, आणि संशोधनातील रस, यामुळे १९७५ पासून त्यांनी अध्यापनास सुरूवात केली, ती आजतागायत!

औरंगाबादच्या गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेजमध्ये लेक्चरर, असोशिएट प्रोफेसर, व नंतर प्रोफेसर अशा चढत्या क्रमानं त्यांची प्रथम क्रमांकावरील निवड महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे झाली. १९९३ साली ''ॲनस्थेशिया'' विभागाच्या प्रमुखपदी त्यांची नियुक्ती झाली. सव्वीस वर्षांच्या आपल्या कारकिर्दीत औरंगाबाद ते सोलापूर, धुळे, मिरज, यवतमाळ अशा अनेक ठिकाणाच्या मेडिकल कॉलेजांमधून विद्यादानाचं कार्य केल्यानंतर, आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी व इतर कौटुंबिक कर्तव्यपूर्तीसाठी स्वेच्छानिवृत्ती घेऊन कऱ्हाडमधील ''कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल् सायन्सेस्'' या खाजगी ट्रस्ट हॉस्पिटल व मेडिकल कॉलेजमध्ये ते रूजू झाले. या ठिकाणीही त्यांनी प्राध्यापकपदापासून मेडिकल डायरेक्टर ते उपकुलगुरू पदापर्यंत भरारी घेतली!



आजही ऑपरेशन थिएटर्समध्ये ते आपलं काम नियमितपणे करीत असतातच, शिवाय अध्यापन आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत स्वत:चे ज्ञान व कौशल्य अद्ययावत् राहील, याची काळजी घेतात. आणि हे करीत असतानाच व्यवस्थापकीय (Administrative) कामातही त्यांचा सहभाग असतो. जोवर हे शक्य आहे, तोवर चालू ठेवण्याची इच्छा डॉक्टर व्यक्त करतात.

भूलतज्ज्ञ आणि अध्यापक अशी दुहेरी जबाबदारी पार पाडताना त्यांना राज्यातील अनेक वैद्यकीय महाविद्यालयातील सहकारी आणि कैक विद्यार्थी लाभले. त्यातील दीडशेहून अधिक विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पदव्युत्तर शिक्षण घेतलं आहे. आज ते अनेक जबाबदारीची पदं भूषवीत आहेत, तर काहीजण परदेशात उच्च पदांवर विराजमान आहेत. आपल्या कारकिर्दीत डॉक्टरांनी या सर्वांना जवळून पाहिलं, त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांचा परिचय करून घेतला.

म्हणूनच या निरीक्षणाच्या तसेच आत्मपरीक्षणाच्या आधारावर ते परखड शब्दात सांगतात, "आजच्या माहिती–तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेमुळे ज्ञानार्जन सहज, सोपं झालं आहे. पण त्या ज्ञानाचा उपयोग करताना अभाव जाणवतो, तो व्यापक (उदार) दृष्टिकोन, नीतिमूल्यं, संस्कृती आणि सहकार्य यांचा, ज्यांची वास्तविक नितांत आवश्यकता असते! मुळात, विद्यार्थी आणि अध्यापक यांचाच दृष्टिकोन झपाट्यानं बदलत आहे! आमच्या पिढीतील ज्येष्ठ अध्यापकांनी हे एक आव्हानच समजून ते कौशल्यानं हाताळीत योग्य सल्ला व मार्गदर्शन देण्याची गरज आहे!

स्वत:च्या अध्यापकीय कारकिर्दीबद्दल बोलताना अत्यंत कृतज्ञ भावनेनं ते उद्‌गारले, "ज्या सर्व शिक्षकांनी मला कायम प्रेरणा दिली, आणि मार्गदर्शन केलं, त्यांच्यामुळेच माझी कारकीर्द घडली, आणि मी विविध पदं भुषवू शकलो. पण महत्त्वाची गोष्ट, म्हणजे आयुष्यात मी शिक्षक झालो, हीच गोष्ट मला अधिक भूषणावह वाटते!" खरोखर! असे विनम्र कृतज्ञ विद्यार्थी जेव्हां अध्यापक बनतात, तेव्हां तेच 'आचार्य देवो भव' ही उक्ती सार्थ करतात!

**सौ. नीलिमा शशिकान्त नाडकर्णी, माहीम**


।। कै. दत्तात्रय वै. पालेकर (पोटली दत्ता), अमृतवाडी
यांचे कृतज्ञतापूर्वक पुण्यस्मरण ।।

**PRACHI FOODS & CATERING SERVICES**

**OF PRAKASH GUDE**

- All types of Delicious Food • Pickles & Papad
- Poojari Available for Devkritya & Dharmakritya
- Our Home Made Goan Speciality-Tikhase Phov/ Churma

A - 305, Best Swasadan, Liliya Nagar, Near Kamat Club,
Goregaon (West), Mumbai - 400 062. ( 9869423494/28744683 )

## जन्मशताब्दी – 'शांताबाई दुर्गाराम कुलकर्णी'



माझी परमपूज्य आई, शांताबाई दुर्गाराम कुलकर्णी (माहेरची सुशीला.... सुशी म्हणून प्रिय होती.) हिच्या जन्मशताब्दी निमित्ताने लिहितांना माझं मन भरुन आलं आहे ! तिच्या स्मृती जपतानां मी कुठं कमी पडणार नाहीं ना, अशीही एक हुरहुर मनाला जाणवत आहे !

माझ्या आईचा जन्म १२/१२/१९११. सर्वात मोठी म्हणून माझ्या आजोबांचा तिच्यावर जास्त जीव होता. माझ्या वडिलांचे २ मे १९४२ रोजी आकस्मिक निधन झालं. वयाच्या ३१व्या वर्षी माझी आई विधवा झाली !

हिंदू कॉलनीत दुसऱ्या गल्लीमध्ये आमचा ब्लॉक होता. माझ्या वडिलांकडे कार होती. त्याकाळी बाकीच्या कोणाकडेही ती नसल्याने आम्हांला तिचा अभिमान वाटायचा. मीच आमच्या मोटारीचा आवाज बरोबर ओळखे. त्याचे माझे मलाच कौतुक असायचे. पण ''देव देतो नि कर्म नेते'' म्हणतात तसें झालं ! दैवाचे फांसे उलटे पडले !

वडिलांच्या निधनानंतर आई आम्हां लहान मुलांना घेऊन आपल्या आई-वडिलांकडे कारवारला गेली. आमच्या आजोबा-आजीनी आम्ही मुलं मोठी होऊन मार्गाला लागेपर्यत आईला भक्कम आधार दिला, जणू कारवारच्या दीपस्तंभासारखांच !

आजोबांना आम्ही 'अण्णा' व आजीला 'आई' म्हणायचो. एकत्र कुटुंबामुळे माझ्या आईला बाकीची भावंडे 'ताई' म्हणत व वडिलांना 'भाऊजी' म्हणत. त्यामुळे आम्ही आईला 'ताई' व वडिलांना 'भाऊजी' म्हणायला लागलो. १२, १४ जणांच्या या मोठ्या कुटुंबात आम्ही सहा भावंडं आनंदानं जगलो. (अर्थात अजूनही तसेच जगतो.)

आजोबा (जे रिटायर्ड सरकारकून म्हणून प्रसिध्द होते) शिस्तप्रिय होते. त्यावेळी त्यांना फक्त रु. ७५/- पेन्शन मिळायचे ! नशिबांने आमची हळग्याला बरीच एकर जमीन होती. अण्णा त्या वयांतही भावाला, मला आळीपाळीने घेऊन कोडीबाग हळगा होडीनं प्रवास करीत. सुदैवानं रयतमंडळी धन्यांना भाव देणारी म्हणजे 'गेण' देणारी होती. ती कारवारला घरी येऊन तांदूळ, पातळ गॉड वगैरे आणून देत. ते आम्हां सर्वानांच वर्षभर पुरे.

ताई दिसायला सुंदर, गोरीपान होती. तरुणपणाच्या वैधव्याचं दु:ख तिनं शांतपणे, धैर्याने पचवलं. आमच्या वडिलांविषयी ती जास्त बोलत नसे. त्यामुळे त्यांचा स्वभाव, कर्तृत्व वगैरे संबंधीच्या गोष्टी आम्हांला काकीकडून व इतर कुटुंबियांकडूनच समजल्या.

माझा मोठा भाऊ प्रभाकर (पबी) शिकायला हुशार. हिंदू हायस्कूलमध्ये तो वर्गात पहिला



नंबर पटकवी. देसाई मास्तरानी मॅट्रीकमध्ये त्याला स्पेशल क्लासमध्ये मार्गदर्शन केले होते. पण ताई कधीतरीच त्याचे कौतुक करी. भावाला त्याचे वैषम्य वाटे. अमक्याचा तमूक मुलगा पहिला आला,म्हणून त्याचे आणखीन ताई कौतूक करी. तिचं म्हणणं ''आपणच अपल्या मुलाचे कौतुक कां करायचं ..... ते लोकांनी केलं पाहिजे !''

शंकर बोरकर माझ्या वडिलांचे एक श्रीमंत मित्र होते. त्यांची पत्नी सरुआक्का हुशार होती. ती ताईची धारवाडची मैत्रीण. ती ताईला म्हणायची ''तुझ्याकडे पैसा नाही ..... पण तुझी मुलं सुंदर, गुणी ... त्यामुळे तूच माझ्यापेक्षा जास्त सुखी आहेस !'' ताईच्या चांगल्या स्वभावामुळें तिने पबीला, मला कॉलेज शिक्षणासाठी दोन दोन वर्षे धारवाडला ठेवून घेतले होते.

ताई मोठ्या भावाकडे, पबीकडे पुण्याला, चंदिगडला व माझ्याकडे ठाण्याला आलटून पालटून राहायची. चारही मुलींची लग्नं तिने आनंदाने पाहिली. त्यावेळी चारही मावश्यांनी फार मदत केली. दुर्देवाने त्यांच्यापैंकी आता कोणी हयात नाहींत.

ताईचे बरेच गुण होते. तिच्या वडिलांप्रमाणेंच ती शिस्तवार होती. चहापाणी, जेवणखाण तिला वेळेवर लागायचे. ती हिशोबांत चोख होती. शिवण, वाचन, रेडिओ, टी. व्ही. वगैरेची तिला आवड होती. आम्हां मुलांवर आई – अण्णा व तिने चांगले संस्कार केले. फोन नव्हते तेव्हां ती लांब पत्रांतून इकडच्या तिकडच्या खबऱ्या लिहून सर्वांशी संवाद साधे. इडलीचे, फणसाच्या पानांचे द्रोण (खोट्टे) ती सुंदर बनवी. कुठल्याही फुलांचे ती छान छान गजरे बनवी. कित्येकजणं येऊन तिची ही कला शिकून जात.

आम्ही सर्व भावंडांनी तिची 'पंच्याहत्तरी' ठाण्यात थाटाने साजरी केली. त्यानंतरही ती कप्प्याच्या गोधड्या करी. आम्हांला जुन्या साड्यांच्या गोधड्या तीच शिवून देई. त्या खरंच जास्त उबदार वाटत. मासळीचे निरनिराळे प्रकार ती रुचकर बनवी. जेवायच्या वेळी तिला सर्व Matching लागायचे. उदाहरणार्थ वरणाबरोबर भजी, डाळी आमटी बरोबर बांगड्यांची किसमोर वगैरे. सगळ्या गोष्टींची तिला हौस होती. एका हॉटेल मध्ये पार्टीच्या वेळी वेटर मेनू-कार्ड घेऊन आला. तेव्हा ''काय असेल ते दे'' अशी तिनं ऑर्डर दिली ! भावाच्या चंदिगडच्या प्रिन्सिपलच्या बंगल्यात ती जशी आनंदात राहिली तशी आधी पुण्याच्या चाळीतही ती आनंदानं राहिली होती.

हॉस्पिटलमध्ये न जातां वयाच्या ८४ वर्षी तिला शांतपणे मरण आलं. जातानां तिनं माझ्या पत्नीकडे (सुलभाकडे – पूर्वाश्रमीची सिंधू) ''तुम्ही दोघांनी माझी चांगली सेवा केली हां!'' असे उद्गार काढले. ते ऐकून आम्हांला जीवनाचे सार्थक झाल्यासारखं वाटलं !

(प्रायोजित)

**– दिनकर कुलकर्णी, ठाणे**

**(२५४०३२०२)**

## कारवारी आनंदमेळावा

कारवारी ज्ञातिबांधव दरवर्षी ज्या आतुरतेने वाट पाहत असतात तो कारवारी आनंदमेळावा यंदा रविवार ४ डिसेंबर रोजी जोगेश्वरीतील के. जी. एस्. हाऊसिंग सोसायटीच्या पटांगणात मोठ्या दिमाखात साजरा झाला.

सायंकाळी साडेपाच वाजल्यापासूनच खाण्यातील दर्दी मंडळींनी वर्दी लावल्यावर दरवर्षीप्रमाणे यंदाही गर्दी लोटणार यात शंकाच उरली नाही. कोलंबी वडे, सुंगटाचे खोल, मोरीचे धबधबे, कोलंबी भात, तिसऱ्याचे वडे अशा कारवारी आकर्षणाबरोबर पातोळी, सुकरुंडे, हीट, मसाला फोव व चवडे असे चविष्ट पदार्थही रसिकांना खुणावत होते. त्यातच चिकन मसाला, बांगडा फ्राय, चिकन सॅलाड व पिझ्झा यांचीही भर पडल्याने खाद्यपदार्थांची रेलचेलच होती. क्षुधा शमनासाठी कोकम-लिंबू सरबत व सोलकढी होतीच. ध्वनीक्षेपकावरुन आपापल्या पदार्थांची जाहिरात करण्याची सुविधा यंदा उपलब्ध करुन दिल्याने खवैय्यांना आपल्या स्टॉलकडे खेचून घेण्याची चुरस अनुभवायला मिळाली. भरपूर खाद्यपदार्थांमुळे यावर्षी विलंबाने येणाऱ्या चाहत्यांना निराश व्हावे लागले नाही.

घरगुती उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने या मेळाव्यात पापड, लोणची, सांडगे, मसाले यासोबत तयार कपडे, दागिने, चादरी व गिफ्ट आर्टिकलचे स्टॉलही होते. खाद्यरत असलेली मंडळी अधून-मधून या स्टॉल्समध्येही डोकावत होती व विविध वस्तूंची खरेदी करीत होती.

यावर्षी ज्ञातिबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांना त्य निमित्ताने जुनी-नवी नात्यातील व परिचयातील माणसे भेटत होती. तरुण वर्गही बऱ्याच प्रामाणात हजर होता. या सर्वांनी खाद्याचा रसास्वाद तर घेतलाच पण जे येऊ शकले नाहीत त्या आपल्या घरच्यांसाठी पार्सल घ्यायलासुध्दा ही मंडळी विसरली नाहीत.

आर्थिक प्रायोजकतेसाठी आपली एन.के.जी.एस.बी. बँक नेहमीप्रमाणेच यंदाही पाठीशी उभी होती. अभ्युदय बँकेनेही थोडासा आर्थिक हातभार यावर्षी लावला होता. के.जी.एस्.को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटीच्या कार्यकारिणी मंडळातील सदस्यांनी सोसायटीचे पटांगण या कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन विशेष साहाय्य केले. या सर्वांचेच मुंबई मंचातर्फे आभार.

या मेजवानीला जे आले आणि जे येऊ शकले नाहीत त्या सर्वांनी पुढील खेप चुकवू नये, मात्र त्यासाठी फक्त एक वर्षभराची वाट पहावी लागेल इतकेच.

| **नावे** | **खाद्यपदार्थ** |
|---|---|
| प्रकाश गुडे | : चिकन मसाला, चिकन बिर्याणी, बांगडा फ्राय |
| उदय कसबेकर | : पातोळी, मेथी भजी |



| | |
|---|---|
| तारा गायतोंडे | : तिसऱ्याचे वडे, सुकरुंडे, सुंगटाचे लोणचे |
| मनोज वाघ | : सोलकढी, कोथिंबीर वडी |
| किशोर बोरकर | : मसाला पोहे (फोव), लिंबू व कोकम सरबत |
| नीता गायतोंडे | : मटन खीमा, बांगडा फ्राय, कोलंबी भात |
| ज्योत्स्ना भांडारे | : कोलंबी फ्राय, चिकन बिर्याणी, चिकन लॉलीपॉप |
| जयश्री कसबेकर | : चिकन सॅलाड, चिकन बन |
| लता रामाणी | : मोरी धबधबे, अळसांडे भाजी, चवडे, पिठाचे लाडू |
| अनुराधा शानभाग | : सुंगटाचे खोल, चिकन मसाला, इडली (हीट) |
| माधुरी रेगे | : मोरी धबधबे |
| स्मिता देसाई | : पुरणपोळी |
| अमोघ कसबेकर | : शाकाहारी पिझ्झा |
| उल्हास वेणतेकर | : चिकन मसाला, सुकरुंडे |
| माधुरी पै | : कोलंबी वडे, चिकन |
| वर्षा औधारे | : लोणची, स्क्वॅश इ. |
| डहाणूकर महाविद्यालय | : मिरगुंड |

### इतर पदार्थ

| | |
|---|---|
| जयश्री फेणे | : कपडे |
| राजेश गायतोंडे | : आसाराम बापू आश्रम उत्पादने |
| जयश्री भेडसगावकर | : जर्मन सिल्व्हर उत्पादने |
| चेतना मुंडकर | : हँड-एम्ब्रोयडरी कपडे |
| आरती मुझुमदार | : ज्वेलरी |
| अल्पना कानविंदे | : मुलांचे कपडे |
| आसावरी भट | : हस्तकला उत्पादने |
| मिहीर खंडेपारकर | : चादरी, अभ्रे इत्यादी |

**डॉ. विवेक कुलकर्णी, दादर**

**WANTED A PART TINE OFFICE ASSISTANT**

For : The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.
**Qualifications :** Basic Computer Operating Knowledge,
Applications with Bio-Data to reach the Secretary before the end of March 2012.

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

(मागील अंकानंतर)

## उल्लेखनीय देणग्या

### एका हितचिंतकाकडून वास्तुफंडास पांच लाख रुपयांची देणगी

एक ज्ञातिबांधव आपले नांव प्रसिध्द न करण्याच्या अटीवर नेहमी भरघोस देणग्या देत असतात. आतांपर्यंत त्यांनी एकूण साडेसहा लाख रुपयांच्या देणग्या दिलेल्या आहेत. या सद्‌गृहस्थांनी अलीकडेच आणखी पांच लाख रुपयांची देणगी दिलेली आहे. ही देणगी संघाच्या वास्तुफंडासाठी आहे.

### ॲडमिरल (निवृत्त) जयंत नाडकर्णी व सौ. विमल यांजकडून दोन लाख रुपयांची देणगी

पुणे येथे स्थायिक झालेले ॲडमिरल (निवृत्त) जयंत गणपत नाडकर्णी हे त्यांचे सुविद्य वडील कै. गणपत नाडकर्णी (लेमन्क्रीम नाडकर्णी) यांच्याप्रमाणेंच ज्ञातीच्या कार्यांत विशेष रस घेतात. ॲड. नाडकर्णी स्वत: विविध प्रसंगी देणग्या देतातच एवढेंच नव्हें तर त्यांच्या नातेवाईकांनांही देणग्या देण्यासाठी उद्युक्त करतात. अलीकडेच ॲड. नाडकर्णी व सौ. विमल यांनी एज्युकेशन सोसायटीला दोन लाख रुपयांची देणगी दिलेली आहे. त्यांतील एक लाख रुपयांची देणगी त्यांचे वडील बंधू प्रसिध्द लेखक व कला समीक्षक कै. ज्ञानेश्वर नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ आहे तर उर्वरीत एक लाख रुपयांची देणगी ॲडमिरल जयंत व सौ. विमल यांच्या आई अनुक्रमे श्रीमती कृष्णाबाई गणपत नाडकर्णी व श्रीमती रमाबाई यशवंत दिवेकर याच्या स्मरणार्थ आहे.

### श्री विठ्ठल (बाळ) व सौ. लता पालेकर यांजकडून आणखी एक लाख रुपयांची देणगी

आपल्या संघाचे हितचिंतक सौ. लता व श्री. विठ्ठल (बाळ) शिवानंद पालेकर हे निरनिराळ्या प्रसंगी सातत्याने भरघोस देणग्या देत असतात. त्यांनी दिलेल्या देणग्यांची एकूण रक्कम कित्येक लाखांत आहे. श्री पालेकर यांच्या मातोश्री श्रीमती दुर्गाबाई शिवानंद पालेकर यांचे हे जन्मशताब्दी वर्ष. त्या निमित्त पालेकर दांपत्यांनी संघाच्या समाजसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिलेली आहे.

### ले. कर्नल रमाकांत व सौ. मंगला वर्टी यांजकडून वृध्दसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी

मूळ बाड या गांवचे काही वर्टी कुटुंबीय अनेक दशकांपूर्वी नाशिक येथे स्थायिक झाले होते. तेथील परिसराला ‘वर्टी कॉलनी’ असेच म्हणत. त्यातलेच एक म्हणजे ले. कर्नल (निवृत्त) रमाकांत



वामन वर्टी. त्यांनी अलीकडेच ९४ वर्षे पूर्ण केली पण अजूनही त्यांचा वाचनाचा व्यासंग चालूच आहे. ते व्यवसायाने डेन्टिस्ट. सेनादलामध्येंच त्यांनी बहुतांश सेवा केली. निवृत्तीच्या वेळी ते लेफ्टनंट कर्नल या हुद्यापर्यंत पोंचले होते. त्यांनी व त्यांच्या पत्नी सौ. मंगला यांनी अलीकडेच ले.कर्नल वर्टी यांचे आईवडील श्रीमती लक्ष्मीबाई व डॉ. वामन अंबाजी वर्टी यांच्या स्मरणार्थ संघाच्या वृध्दसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिलेली आहे.

### कै. गोविंद गांवकर यांच्या स्मरणार्थ एक लाख रुपयांची देणगी

हिंदू हायस्कूल, कारवार येथील एक निवृत्त शिक्षक व आपल्या एज्युकेशन सोसायटीचे कारवार येथील जुने प्रतिनिधी श्री मारुति अच्युत गांवकर यांचे धाकटे बंधु श्री गोविंद गांवकर यांचे सुमारे सात वर्षापूर्वी निधन झाले. त्यांच्या कुटुंबीयांनी अलीकडेच एक लाख रुपयांची देणगी दिलेली आहे. त्यांतील पन्नास हजार रुपये वृध्दसेवा निधीसाठी आहेत तर उर्वरीत पन्नास हजार रुपये एज्युकेशन सोसायटीसाठी आहेत.

### संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | एन के जी एस बी बँकेकडून | १०,००० |
| २. | श्री मारुति सुब्राव दिवेकर यांजकडून पुत्र डॉ. रामानंद व पत्नी श्रीमती शुभा यांच्या स्मरणार्थ | ५,००० |
| ३. | आईवडील श्रीमती दुर्गाबाई व श्री प्रभाकर नागेश वागळे व बंधू श्री रजनीकांत प्रभाकर वागळे यांच्या स्मरणार्थ डॉ. सुनंदा वागळे, श्रीमती सुमन माधव बोरकर व श्रीमती शांता मोहन बोरकर यांजकडून | ५,००१ |
| ४. | श्रीमती दुर्गाबाई शिवानंद पालेकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त स्नुषा श्रीमती लता व पुत्र श्री विठ्ठल (बाळ) पालेकर यांजकडून | १,००,००० |
| ५. | अनामिकाकडून | ६,००० |
| ६. | श्री रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या १५ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |
| ७. | श्री के. वाय. नाडकर्णी ट्रस्ट कडून | ४,८०० |
| ८. | श्रीमती लीला व श्री अनंत नारायण नाईक यांच्या स्मरणार्थ त्यांच्या मुलीकडून व बंधुभगिनीकडून | १०,००० |
| ९. | श्रीमती उमा (कुसुम) सदानंद नाडकर्णी यांच्या ७५ व्या वाढदिवसा निमित्त मुले श्री प्रवीण, श्री दुर्गाप्रसाद व कन्या श्रीमती स्मिता प्रवीण पिकळे यांजकडून | २१,००० |

१०. श्री वसंत महारुद्र कसबेकर यांच्या इच्छेनुसार २५,०११

११. एन. के. जी. एस. बी. बँकेकडून ११ शाखांच्या उद्‌घाटन प्रसंगी श्री दत्तात्रय नागेश नाडकर्णी यांच्या मार्फत ११,१११

१२. श्रीमती सरोज प्रभाकर (पबा) बोरकर यांच्या स्मरणार्थ बंधू डॉ. प्रकाश दत्तात्रय मुझुमदार यांजकडून ५,०००

१३. श्रीमती उमाबाई व श्री दत्तात्रय महाबळेश्र्वर मुझुमदार यांच्या स्मरणार्थ पुत्र डॉ. प्रकाश व स्नुषा श्रीमती स्मिता यांजकडून १०,०००

१४. प.पू. कैवल्यपूर मठाधिपती श्रीशिवानंद सरस्वती स्वामी महाराजांकडून संस्कृत पाठांतर स्पर्धेसाठी ५,०००

## वृध्दसेवा निधीसाठी

१. श्रीमती अनघा आनंद वागळे यांजकडून ३,०००

२. श्रीमती इंदिरा व श्री दिनकर मंगेश कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ नातू
श्री सौमेन सुभाष सबनीस यांजकडून ५,०००
नातू श्री सत्येन् सुभाषचंद्र सबनीस यांजकडून ५,०००

३. श्री दिनकर श्रीनिवास तेलंग यांच्या स्मरणार्थ ५,०००
श्री माधव श्रीनिवास तेलंग यांच्या स्मरणार्थ ५,०००
भाचे नातू श्री सत्येन् सुभाषचंद्र सबनीस यांजकडून

४. श्री श्रीपाद मंगेश ब्रह्मे यांच्या पहिल्या पुण्यतिथी निमित्त कन्या श्रीमती नीलिमा विनोद नाडकर्णी यांजकडून ५,०००

५. अनामिकाकडून ५,०००

६. श्री मनोहर शंकर वागळे यांच्या १२व्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री सतीश यांजकडून १,००१

७. श्रीमती लक्ष्मीबाई व डॉ वामन अंबाजी वर्टी यांच्या स्मरणार्थ पुत्र लेफ्ट. कर्नल (निवृत्त) रमाकांत व स्नुषा श्रीमती मंगला यांजकडून १,००,०००

८. श्री गोविंद अच्युत गांवकर यांच्या स्मरणार्थ गांवकर कुटुंबीय, पुणे यांजकडून ५०,०००

९. श्री मंगेश वसंत नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ आईवडील श्रीमती अलका व श्री वसंत मनोहर नाडकर्णी यांजकडून २,०००



१०. श्री वासुदेव वैकुंठ देसाई यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी त्यांच्या प्रेमळ स्मृतीस अभिवादन म्हणून कन्या श्रीमती ज्योती व जामात श्री माधव मंगेश मुझुमदार यांजकडून १०,०००

## वास्तुफंडासाठी

१. श्री गोपाळ सर्वोत्तम तेलंग यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र सर्वश्री मिलींद व निमिष यांजकडून २,००१

२. हितचिंतकाकडून ५,००,०००

## एज्युकेशन सेसायटीस मिळालेल्या देणग्या

१. आईवडील श्रामती मालती व श्री नीलकंठ धुमें व पितरांच्या स्मरणार्थ पितृपक्षानिमित्त श्री चंद्रशेखर नीलकंठ धुमें यांजकडून १,०००

२. एन्.के.जीस्.बी. को. ऑप. बँकेकडून १०,०००

३. श्रीमती दुर्गाबाई व श्री शिवानंद बाळकृष्ण पालेकर यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती निर्मला मधुसूदन कसबेकर यांजकडून १०,०००

४. श्रीमती शांताबाई व श्री शामराव दुर्गप्पा कसबेकर यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती निर्मला मधुसूदन कसबेकर यांजकडून १०,०००

५. श्री रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या १५ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून १,००१

६. श्री के. वाय. नाडकर्णी ट्रस्टकडून ४,८००

७. श्री गोविंद अच्युत गांवकर यांच्या स्मरणार्थ गांवकर कुटुंबीय, पुणे यांजकडून ५०,०००

८. डॉ. महारुद्र वेंकटराव कुलकर्णी यांच्या १० व्या पुण्यतिथी निमित्त कन्या श्रीमती अपर्णा महारुद्र कुलकर्णी यांजकडून १०,०००

९. प्रसिध्द लेखक आणि समीक्षक श्री ज्ञानेश्र्वर गणपत नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ बंधू ॲड. (निवृत्त) जयंत गणपत नाडकर्णी व सौ. विमल यांजकडून १,००,०००

१०. ॲडमिरल (निवृत्त) जयंत गणपत नाडकर्णी व श्रीमती विमल यांजकडून उभयतांची आई श्रीमती कृष्णाबाई गणपत नाडकर्णी व श्रीमती रमाबाई यशवंत दिवेकर यांच्या स्मरणार्थ १,००,०००

११. श्रीमती सुलोचना व डॉ. अनंत वामन वर्टी यांच्या स्मरणार्थ डॉ. अ.वा. वर्टी यांच्या जन्मशताब्दीप्रसंगी कन्या श्रीमती स्मिता प्रकाश मुझुमदार याजकडून १०,०००

१२. डॉ. प्रकाश दत्तात्रय मुझुमदार यांच्या ७५व्या वाढदिवसाच्या प्रसंगी पत्नी श्रीमती स्मिता यांजकडून १०,०००

## ठाणे मंच देणगीदारांची यादी

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. सदानंद विनायक नाडकर्णी, माहीम | ३,००० |
| २. | श्रीमती ज्योती सुभाष वागळे, जोगेश्वरी | ५,००० |
| ३. | श्री गिरीश महाबळेश्वर देसाई, अंधेरी | २,५०० |
| ४. | श्री लक्ष्मण कृष्ण महाले, अंधेरी | १,००० |
| ५. | श्री सुभाष बाळकृष्ण पालेकर, पार्ले | १,५०० |
| ६. | श्री दिलीप वासुदेव देसाई, लोणावळा | १,००० |


**Contact : Priya Prakash Telang**

*SHANTA CREATIONS*

**DIGITAL MEDIA**
- Website Designing & Development
- Flash Web Banners and Presentation
- Optimised Flash Website ❑ and more...

**PRINT MEDIA**
- Brochure Designing
- Catalogues & Product Box Designing
- Outdoor Media ❑ and more...


**3D & VFX**
- 3D Modeling, Texturing, Rigging, Lighting
- 3D Animation
- 3D Architectural Walkthrough
- Motion Graphics
- Visual Effects ❑ and more...

SHanTa™

**SHANTA I PORTAL PVT. LTD.**
Roman House, Opp. Tera Panth Bhavan, Nr. Cambridge School,
Thakur Complex, Kandivali (East), Mumbai - 400 101.
Cell : 93215 95487 / 98202 33202 ● Tele/Fax : 022-2854 2421
www.shantacreations.com ● info@shantacreations.com




Regd. with Registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.